# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 266/2022 दिनांक: 08.07.2022**

## 1)मो. सा. चोरी :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 01.07.2022 रोजी 21.30 ते दि 02.07.2022 चे 04.00 वा. चे दरम्यान, **लालवाडी शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे भावाची होंडा लिओ कंपनीची काळया रंगाची मो.सा. क्रं. एम.एच.–26/बीजे.–0547 किंमती 30,000/–रूपयाची फिर्यादीने घरा समोर लावुन झोपी गेला असता नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी विनायक राम कांबळे, वय 20 वर्षे, व्यवसाय गवंडीकाम रा. लालवाडी शिवाजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 259/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/882 सुर्यवंशी, मो.क्रं. 9421870108** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 05.07.2022 रोजी 04.30 वा. चे सुमारास, **साईमंदीरा जवळ मुखेड ते पांडुर्णी रोडवर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा पेटवडज येते भांडी विक्री करून परत गावाकडे येत असतांना अनोळखी चोरटयाने हात दाखवुन गाडी थांबवली व मला मुखेडलाच जायचे आहे असे म्हणुन गाडीवर बसला. साई मंदिर पांडुरणी ते मुखेड रोडवर आले असता फिर्यादी हा लघवीसाठी गाडी थांबवुन उतरला व गाडीलाच चावी ठेवली असता तेवढयात संधी साधुन फिर्यादीची होंडा शाईन क्रं एमएच.–26/डब्ल्यु.8213 किंमती 40,000/–रूपयाची चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शिवराज एकनाथ डोईजड, वय 42 वर्षे, व्यवसाय भांडी विक्री रा. गायत्री गल्ली मुखेड ता. मखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 211/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अंसापुरे, मो.क्रं. 8007807771** हे करीत आहेत.

## 2)मोबाईल चोरी :–

**हिमायतनगर :–**दिनांक 06.07.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **उमर चौक ते परमेश्वर कमान दरम्यान हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यातील फिर्यादी हा एका काळया रंगाच्या ॲटो मध्ये उमर चौक हिमायतनगर येथुन बसुन रेल्वे स्टेशनला जात असतांना यातील ॲटो मध्ये बसलेले तीन अनोळखी चोरटयाने फिर्यादीचे शर्टचे खिशातील ओपो कंपनीचा मोबाईल किंमती 21,000/–रूपयाचा चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शिवाजी धोंडीबा बुलबुले, वय** 54 वर्षे, व्यवसाय नौकरी सहा लेखापाल म. रा. वि. वी. कंपणी उपविभाग हिमायतनगर रा. गंगानगर हाऊसींग सोसायटी **नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 165/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो.क्र. 9049075521** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या राहाते घरी बिलालनगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड व नर्सी ह.मु. शामनगर नर्सी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस बकऱ्याच्या व्यापार करण्यासाठी तुझ्या माहेरहुन चाळीस हजार रूपये घेऊन ये व तुला मुलगा होत नाही तु दिसायला चांगली नाहीस असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन उजवे हातावर रॉडने मारून जखमी केले व. शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 194/2022 कलम 498(अ),324, 323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1839 कांबळे, मो.क्रं. 9823342366** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 21.03.2016 ते दि. 07.11.2021 वा. चे दरम्यान, **सिंधी कॉलनी तारकापुर अहमदनगर ह. मु. नंदीग्राम सोसायटी हनुमानगड नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे पतीला कॅनडाला जाण्याकरीता 10 लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन थापड बुक्यानी मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व मानसिक छळ केला. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 194/2022 कलम 498(अ),324, 323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/967 गायकवाड, मो.क्रं. 9923888322** हे करीत आहेत.

## 4)महाराष्ट्र वै़द्यकीय व्यवसाय अधिनियम :—

**1)बिलोली :—** दिनांक 07.07.2022 रोजी 12.10 चे सुमारास, **आरोपीचे दवाखाना नविन येसगी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने व त्यांच्या पथकातील लोकांनी येसगी नवीन ता. बिलोली येथे श्री गरीरेडी रामलुर नरशीह यांच्या वैद्यकीय व्यवसायाच्या ठिकाणी भेट दिली असता त्यांच्याकडे इलेक्ट्रोपॅथी ची पदवी असतांना त्यांनी अनाधिकृत पणे अलोपॅथीचे औषधी वापरले व सोबत बाळगले आहे. तसेच अर्धवट वापरलेल्या स्वरूपात डेक्सामायसीन सल्फेट आणि जेंटामायसीन इंजेक्शन व वापरलेल्या सिरींज व इतर आलोपॅथीचे गोळया आढळुन आल्या आहेत. त्यांना अलोपॅथीचे औषधी वापरून व्यवसाय करण्याची करण्याची परवाणगी नसतांना त्यांनी ते अनाधिकृत पणे वापरल्याचे व बाळगल्याचे आढळुन आले.वगैरे **फिर्यादी मोहन माणिकराव देवराये, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी ता. आरोग्य अधिकारी ने. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 170/2022 कलम 33(2) महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम 2000 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बोधने, मो.क्रं. 9890762000** हे करीत आहेत.

## 5)गैर कायद्याची मंडळी :—

**1)मुदखेड :—** दिनांक 03.07.2022 रोजी चे 13.00 वा. चे सुमारास, **मातासाब गुरूद्वारा मुगट यांचे मुख्य दरवाजा समोर सार्वजनिक रोडवर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गदी वारसा हक्काचे अनुषंगाने वादाचे कारणावरून गैर कायदयाची मंडळी जमवुन हातात बेकायदेशिररित्या तलवारी शस्त्र बाळगुन मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोह/2189, किशोर दत्तात्रय पाटील** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 151/2022 कलम 143 भादवी सह कलम 135 म. पो. का. सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2187 आलेवार, मो.क्रं. 9158756087** हे करीत आहेत.

## 6)अपघात :—

**भोकर :—** दिनांक 06.07.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **राहाटी ते नांदा डांबरी रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे चंद्रकांत संभाजी धसाडे, वय 24 वर्षे, रा. मोखंडी ता. उमरी जि. नांदेड** हे त्यांचे सोबत एक असे मो सा वर जात असतांना पाठीमागुन ट्रक क्रं एमएच—26/टीके—3777 चौदा टायरच्या ट्रक मालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मो सा ला जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास व सोबतच्या व्यक्तीस जखमी करणेस कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी संतोष माधवराव गागदे, वय 41 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बोरगाव ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 247/2022 कलम 279, 337, 338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2058 कदम, मो.क्र. 9049320582** हे करीत आहेत.

## 7)शाळेचा कडी कोंडा तोडुन नासधुस :—

**उस्माननगर** :— दिनांक 06.07.2022 रोजी चे 17.00 ते दि. 07.07.2022 चे 08.30 वा. चे दरम्यान, **श्री साईबाबा हायस्कुल मारतळा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील श्री साईबाबा हायस्कुल मारतळयाचे शाळेचे दरवाजाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून लोखंडी कपाटाचे अंदाजे 5000/—रूपयाचे नुकसान केले व कपाटतील सामान फेकुन दिले. वगैरे **फिर्यादी एकनाथ विठ्ठलराव मोरे, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी मुख्याध्यापक रा. पंकजनगर धनेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्मानगर** गुरनं 130/2022 कलम 457, 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2330 कानगुले, मो.क्र. 7744019830** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**1)उमरी :—** दिनांक 07.07.2022 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **बल्लाळ शिवार आरोपीचे शेतात ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारू 5500/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2533, सिध्दार्थ शंकरराव केळकर, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 181/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/केंद्रे, मो.क्र. 8972683474** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 07.07.2022 रोजी चे 18.10 वा. चे सुमारास, **बेलुर पोलीस चेक पोस्ट समोर सार्वजनिक रोडवर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी दारू 1460/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2177, सुभाष बाबाराव मंगल, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 167/2022 कलम 65 (ई), 83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2298 कसलोड, मो.क्र. 9889598742** हे करीत आहेत.

**3)अर्धापुर :–** दिनांक 07.07.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **छत्रपती शिवाजी चौक येथे विशाल हॉटेल मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1800/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1279, पपु जयहिंद चव्हाण, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 196/2022 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2803 चाटे, मो.क्र. 9673111588** हे करीत आहेत.

**4)अर्धापुर :–** दिनांक 07.07.2022 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **आयडीया टावर जवळील फायुस्टार बिर्यानी हॉटेल मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1800/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/2202, संतोष शामराव सुर्यवंशी, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 195/2022 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2803 चाटे, मो.क्र. 9673111588** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड